CMYK

राज्यसभा निवडणूक : २६ उमेदवारांची बिनविरोध निवड; बिहारमधील सर्व ५ जागांवर एनडीएचा विजय >> पान 2

बुलढाणा जिल्ह्यात जल उत्सवाचा जागर; सारवळी खुर्द व गारगुंडी येथे जल अर्पण सोहळा >> पान 3

इंधन टंचाईच्या काळातही शेगाव संस्थान स्वयंपूर्ण; गॅसविना ५० हजार भाविकांना दररोज महाप्रसाद >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



अरिजीत सिंगनं पार्श्वगायन सोडल्यानंतर श्रेया घोषालनं मांडलं मत, म्हणाली मलाही विश्रांती घ्यावीशी वाटते
आतील पान

**सुविचार**

परमेश्वर तरल आहे, परंतु विद्वेषपूर्ण नाही.
– अल्बर्ट आइनस्टाइन––

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 217 ■ मंगळवार, दि. 17 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने पाणीदार महाराष्ट्राचा संकल्प : मुख्यमंत्री फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पाणी फाउंडेशनने महाराष्ट्राच्या जलसंधारण क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. या फाउंडेशनने राज्य शासनाच्या समवेत राज्याला बसणाऱ्या दुष्काळाची तीव्रता कमी करण्यात मदत केली.यापुढेही पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने पाणीदार महाराष्ट्राचा संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मंत्रालयात आयोजित बैठकीत पाणी फाउंडेशनच्या जलसंधारण कामाच्याबाबत सादरीकरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

बैठकीस कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक परिमल सिंग, पाणी फाउंडेशनचे संस्थापक आमिर खान, किरण राव, पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ, तसेच अमित चंद्रा, विलास शिंदे आदी उपस्थित होते. दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, कृषी विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हवामान विषयक संशोधन करणाऱ्या विविध संस्थांनी यावर्षी एल निनोचा प्रभाव जाणवणार असल्याचे मत केले आहे त्यामुळे राज्यात ८० टक्के पाऊस होईल, असे गृहीत धरून जलसंधारणाच्या कामांचे नियोजन करावे. पाणी फाउंडेशनच्या मागील कामाचा अनुभव बघता त्यांच्या माध्यमातून यावर्षीही शेतकरी, ग्रामस्थ जलसाक्षर होतील. पाण्याचे महत्व ओळखून फाउंडेशन काम करत आहे. या कामासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी फाउंडेशनला मदत करावी. त्यासाठी पूरक यंत्रणा सज्ज ठेवावी. फाउंडेशन राज्यात करीत असलेल्या जलसंधारणाच्या कामांमध्ये मृद व जलसंधारण विभागाचाही समावेश करावा. पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून होत असलेल्या कामाचा दर्जा चांगला राखण्यासाठी, त्यांच्या मागणीनुसार नियंत्रण आणि पडताळणी यंत्रणेची आवश्यकता आहे. यासाठी कृषी सहाय्यक तसेच ग्रामविकास विभागाच्या उमेद अभियानामधील कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली व्यवस्था उभारण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीत पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ यांनी सादरीकरण केले. यावेळी संस्थापक आमिर खान, किरण राव, अमित चंद्रा यांनीही जलसंधारणाची कामे प्रभावी होण्यासाठी मते व्यक्त केली. फाउंडेशनने राज्यामध्ये स्वयंसेवक तत्त्वावर १३ हजार १२१ शासकीय अधिकाऱ्याचे मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षणासाठी नोंदणी केली आहे. तसेच फार्मर कप निवासी प्रशिक्षणासाठी १६ हजार २६० शेतकरी सहभागी झाले आहेत. यामध्ये ५७.५६ टक्के महिला शेतकरी आहेत तसेच ११ हजार ९५ निमंत्रकांनी नोंदणी केली आहे.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची अंमलबजावणी करताना १ ऑक्टोबर २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्राप्त अर्जांपैकी १ लाख ८ हजार घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्र राज्याने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

महिना तीनशे युनिटपर्यंत वीजवापर असलेल्या घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य व्हावे व अतिरिक्त वीज विकून त्यांना उत्पन्नही मिळावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने ही योजना सुरू केली आहे. सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या थेट उपयोगाच्या या योजनेच्या अंमलबजावणीवर भर देण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

केंद्र सरकारने गेल्या पाच महिन्यांतील योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेताना १ ऑक्टोबर २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांपैकी किती अर्जदारांच्या घरी सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले, याचा विचार करण्यात आला. यामध्ये महाराष्ट्र १ लाख ८ हजार ३२७ स्थापित सौरऊर्जा प्रकल्पांसह पहिल्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश (९५ हजार ६६५), गुजरात (९४ हजार ३६४), राजस्थान (३९ हजार ४८४) व केरळ (३६ हजार ८३६) ही राज्ये अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या क्रमांकावर आहेत. देशामध्ये या कालावधीत प्राप्त अर्जांपैकी एकूण ५ लाख ५७ हजार २२४ घरगुती ग्राहकांकडे सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले. त्यापैकी १९ टक्के प्रकल्प महाराष्ट्रात बसविण्यात आले.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घरगुती ग्राहकांना छतावर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये अनुदान थेट दिले जाते. ऊर्वरित रक्कम लाभार्थी वीजग्राहकाने भरायची असते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीज निर्माण होते. छतावरील सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पातून ग्राहकाच्या गरजेपेक्षा जास्त वीज निर्माण झाल्यामुळे त्याचे बिल शून्य होते तसेच अतिरिक्त वीज विकून त्याला उत्पन्नही मिळते. एकदा सौरऊर्जा प्रकल्प बसविला की त्यातून २५ वर्षे वीजनिर्मिती होते.

केंद्र सरकारतर्फे ग्राहकांना मिळणाऱ्या अनुदानात राज्य सरकारतर्फे आणखी भर घालून राज्यातील दारिद्र्य रेषेखालील आणि महिना १०० युनिटपेक्षा कमी वीज वापर असलेल्या गरीब गटातील एकूण पाच लाख वीज ग्राहकांसाठी स्मार्ट योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या निविदेत प्रती किलोवॅट केवळ ४५,४९५ रुपये इतका खर्च निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे तसेच केंद्र सरकार व राज्य सरकारच्या अनुदानामुळे या ग्राहकांना खूपच कमी लाभार्थी हिस्सा भरून मोफत वीज मिळविता येणार आहे.

## स्वयंसेवी वैद्यकीय सेवेला प्रोत्साहन देण्यासाठी सीएमई क्रेडिट गुण प्रणाली, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून पारदर्शक व सर्वसमावेशक निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली ग्रामीण व दुर्गम भागात आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी कार्यरत असलेल्या वैद्यकीय तज्ज्ञांच्या स्वयंसेवी सेवेचा सन्मान आणि प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (MMC) सातत्याने सकारात्मक पावले उचलण्यात येत आहे.

याच अनुषंगाने स्वयंसेवी सेवेकरिता उचए (Continuing Medical Education) क्रेडिट गुण प्रणाली अधिक प्रभावी करण्यासाठी स्पष्ट व पारदर्शक धोरण राबविण्यात येत आहे. स्वयंसेवी सेवेसाठी सीएमई (CME) क्रेडिट गुण देण्याबाबत सखोल विचार करून परिषदेकडून सध्या अंमलात असलेल्या प्रणालीची माहिती स्पष्ट करण्यात आली आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने मान्यताप्राप्त असलेल्या संघटना, संस्था, अध्यापन संस्था तसेच वैद्यकीय महाविद्यालयांना ठराविक निकष व मार्गदर्शक तत्वांनुसार उचए क्रेडिट गुण प्रदान करण्यात येत आहेत. यामुळे वैद्यकीय व्यावसायिकांचे ज्ञान अद्ययावत राहण्यासोबतच त्यांच्या सामाजिक बांधिलकीलाही चालना मिळत आहे. ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागात शस्त्रक्रिया, वैद्यकीय शिबिरे किंवा आरोग्य सेवा देणाऱ्या परंतु अद्याप मान्यता नसलेल्या संस्था, संघटना किंवा रुग्णालयांसाठीही शासनाने स्पष्ट मार्ग खुला करून दिला आहे. अशा संस्थांनी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून मान्यता (Accreditation) प्राप्त केल्यानंतर त्यांनाही उचए क्रेडिट गुण देण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

या निर्णयामुळे एकीकडे वैद्यकीय सेवेच्या गुणवत्तेची खात्री राहणार असून, दुसरीकडे स्वयंसेवी आरोग्य उपक्रम अधिक शिस्तबद्ध, उत्तरदायी आणि परिणामकारक ठरणार आहेत. मान्यता प्रक्रियेमुळे वैद्यकीय शिबिरांचे नियोजन, उपचारांची गुणवत्ता आणि रुग्ण सुरक्षेला प्राधान्य मिळणार आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या या धोरणात्मक निर्णयामुळे राज्यातील वैद्यकीय व्यावसायिकांना स्वयंसेवी कार्याकडे अधिक प्रेरणा मिळणार असून, शासनाच्या 'सर्वांसाठी दर्जेदार आरोग्यसेवा' या संकल्पनेला बळ मिळणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील सेवाभाव, कौशल्यवृद्धी आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा समतोल साधणारी ही CME क्रेडिट गुण प्रणाली राज्याच्या आरोग्य व्यवस्थेसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

## मेहकरमध्ये देहव्यापारावर पोलिसांचा छापा; एक आरोपी अटकेत

**मेहकर/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर शहरात पोलिसांनी देहव्यापाराच्या अड्ड्यावर धडक कारवाई करत एका आरोपीला अटक केली असून दोन महिलांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई मेहकर बायपास रस्त्यावरील एका हॉटेल अँड लॉजिंगमध्ये करण्यात आली.

मेहकर पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, बायपास रोडवरील एका हॉटेल अँड लॉजिंगमध्ये अवैध देहव्यापार सुरू आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून सापळा रचला. त्यानंतर पोलिसांनी अचानक छापा टाकत कारवाई केली. या कारवाईत प्रमोद धनसिंग पवार (रा. बिबी, ता. लोणार) याला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध मेहकर पोलीस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दोन




महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक व्यंकटेश्वर एस. आलेवार यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक कांचन जारवाल, पोहेकॉ. लक्ष्मण कटक, प्रभाकर शिवणकर, शिवानंद केदार, पोकॉ. मोहम्मद परसुवाले, करीम शहा, शिवाजी चिम, विनांद फुफाटे, मपोकॉ. आम्रपाली सरकटे तसेच होमगार्ड सचिन इंगळे, संनिल काटकर आणि उमेश देबाजे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

दरम्यान, शहरात अशा प्रकारचे अवैध प्रकार आढळल्यास नागरिकांनी त्वरित मेहकर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## रक्तबंबाळ अवस्थेत रुग्णालयात, डॉक्टरांकडून तातडीची शस्त्रक्रिया, तारकेश्वर गडाच्या महंत अदिनाथ महाराजांच्या प्रकृतीबाबत महत्त्वाची अपडेट

अहिल्यानगर : अहिल्यानगरच्या तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांनी रविवारी स्वत:ला इजा करुन घेतल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यामुळे त्यांना गुरुस्थानी मानणाऱ्या भक्त संप्रदायात चिंतेचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर आता त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांकडून एक महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली आहे.

तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्रींची तब्येत स्थिर असल्याचे डॉ. हर्षवर्धन तनवर यांनी सांगितले आहे. महाराजांवर यशस्वी शस्त्रक्रिया झाली असून लवकरच ते बरे होतील अशी माहिती डॉक्टरांनी दिली आहे. त्यामुळे महाराजांच्या भक्तांनी त्यांना भेटायला येऊ नये. जेणेकरुन त्यांना कोणत्याही प्रकारचे इन्फेक्शन होणार नाही, असं आवाहन डॉक्टर हर्षवर्धन तनवर आवाहन केले आहे. काही दिवस त्यांना हॉस्पिटलमध्ये ठेवावे लागेल. त्यानंतर डिस्चार्ज दिला जाईल अशी माहिती डॉक्टरांनी दिली आहे.याशिवाय, तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांचा रुग्णालयातील एक प्रतिक्रिया समोर आली असून माझी प्रकृती स्थिर आहे. मी लवकरच गडावर येईल, असे शास्त्री महाराजांनी म्हटले आहे.




## पळशी झाशी तिर्थ स्थळाला दोन कोटी रुपये मंजुर; संस्थांच्या वतीने केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा सत्कार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील पळशी झाशी या तीर्थस्थळाला दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. संस्थांच्या वतीने केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचा सत्कार नुकताच सत्कार करण्यात आला.

बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातर्गत येणारे पळशी झाशी शंकरगिरी महाराज संस्थांन हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या संस्थांला सरकारच्यावतीने ब दर्जा तीर्थस्थळाचा दर्जाही देण्यात आला आहे. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत दोन कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव व या विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय कुटे यांच्या वतीने या संस्थांना निधी मिळावा यासाठी पाठपुरावा करण्यात आला होता.



या पाठपुराव्याला यश आले असून १३ मार्च रोजी यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित झाला आहे. त्यामुळे या तीर्थस्थळाच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. या निधी अंतर्गत भव्य सभागृह प्रसादालय इतर विकसित कामे केल्या जाणार आहे. दिलेला शब्द पाळला आणि भरीव अशी मदत पळशी झाशी संस्थांना केल्याबद्दल संस्थांचे विश्वस्त अरुण पाटील मोरोडे यांनी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेऊन सत्कार केला.

CMYK

## अवकाश संशोधनातील पाश्चात्त्य महिलांचे योगदान

मानवाने आकाशाकडे पाहत विश्व समजून घेण्याचा प्रयत्न सुरू केला, तेव्हा खगोलशास्त्र ही केवळ विज्ञान शाखा नव्हती; तर तो अस्तित्वाविषयीचा मूलभूत शोध होता. हजारो वर्षे हा शोध पुरुषप्रधान इतिहासातून मांडला गेला; परंतु प्रत्यक्षात विश्वाच्या अभ्यासात महिलांचे योगदान अत्यंत खोल आणि निर्णायक राहिले आहे. प्राचीन निरीक्षण परंपरेपासून आधुनिक अवकाश दुर्बिणी आणि अंतराळ मोहिमांपर्यंत, जगभरातील महिलांनी खगोलशास्त्राच्या विकासाला दिशा दिली. त्यामुळे 'महिला दिना'च्या निमित्ताने, या योगदानाचा प्राचीन ते आधुनिक असा व्यापक आढावा घेणे आवश्यक ठरते. प्राचीन संस्कृतींमध्ये आकाशनिरीक्षण हे शेती, कालमापन आणि नौकानयनाशी जोडलेले होते. इजिप्त, ग्रीस आणि मेसोपोटेमिया संस्कृतींमध्ये महिलांचा विद्वत्तापूर्ण सहभाग दिसून येतो. चौथ्या-पाचव्या शतकातील अलेक्झांड्रिया येथे कार्य करणारी हायपेशिया, ही इतिहासातील पहिल्या नोंदलेल्या महिला गणितज्ञ आणि खगोल विचारकांपैकी एक मानली जाते. ग्रहांच्या गतीविषयीचे 'गणिती मॉडेल' समजावून सांगणे, खगोलनिरीक्षण उपकरणांची सुधारणा आणि वैज्ञानिक शिक्षणामध्ये तिचे योगदान उल्लेखनीय होते. वैज्ञानिक विचारसरणीचा प्रसार करताना, तिने तर्कबुद्धीला धार्मिक अंधश्रद्धेपेक्षा प्राधान्य दिले आणि त्यामुळे ती वैज्ञानिक स्वातंत्र्याचे प्रतीक ठरली. परंतु, त्यावेळी अलेक्झांड्रियातील राजकीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, इ.स. ४१५ मध्ये ख्रिस्ती जमावाने तिची हत्या केली. मध्ययुगीन युरोपमध्ये विज्ञानसंशोधन संस्थात्मक स्वरूपात विकसित होत असताना, महिलांना औपचारिक प्रवेश मर्यादित होता. तरीही, जर्मनीतील खगोल निरीक्षणे करणाऱ्या मारिया विंकेलमन यांनी धूमकेतूचा शोध लावला. परंतु, त्या काळातील सामाजिक संकेतांमुळे, शोधाचे श्रेय त्यांच्या पतीला देण्यात आले. हा प्रसंग विज्ञान इतिहासातील लिंगभेदाचे स्पष्ट उदाहरण मानला जातो. खगोल निरीक्षणातील अचूकता आणि सातत्यपूर्ण नोंदी ठेवण्यामध्ये महिलांचे योगदान असूनही, त्यांची ओळख अनेकदा पुसली गेली . १८व्या आणि १९व्या शतकात दुर्बिणींच्या विकासामुळे, निरीक्षणात्मक खगोलशास्त्रात क्रांती झाली आणि येथे महिलांची भूमिका अधिक स्पष्ट झाली. ब्रिटनमधील कॅरोलिन हर्शेल यांनी अनेक धूमकेतू शोधले, तसेच ताऱ्यांची सूची तयार करण्यात महत्त्वपूर्ण काम केले. त्या राजदरबारी वेतन घेणाऱ्या पहिल्या महिला खगोल-संशोधक ठरल्या. त्यांचे कार्य आधुनिक ताऱ्यांच्या वर्गीकरणाच्या पायाभूत टप्प्यांपैकी एक मानले जाते. याच काळात अमेरिकेत उदयास आलेल्या हार्वर्ड कम्प्युटर्स या महिला संशोधकांच्या समूहाने, आधुनिक खगोलशास्त्राची दिशा बदलली. विल्यमिना फ्लेमिंग, ॲलनी जंप कॅनन आणि हेन्रियेटा लेव्हिट यांनी, ताऱ्यांच्या वर्णपटांचा अभ्यास करून 'तारकावर्गीकरण' प्रणाली विकसित केली. विशेषतः लेव्हिट यांनी 'सेफिड' चलताऱ्यांच्या प्रकाशमानता आणि कालावधी यांतील संबंध शोधून काढला. या शोधामुळे आकाशगंगांमधील अंतर मोजण्याची पद्धत विकसित झाली आणि विश्वाच्या आकाराविषयीचे आकलन पूर्णपणे बदलले. पुढे एडविन हबल यांनी विश्व विस्तारत असल्याचा निष्कर्ष मांडण्यासाठी, याच कार्याचा आधार घेतला. २०व्या शतकाच्या प्रारंभी सेसिलिया पेन-गॅपॉश्किन यांनी, तारकांची रासायनिक रचना समजावून सांगणारा क्रांतिकारी सिद्धांत मांडला. 'सूर्य आणि इतर तारे मुख्यतः हायड्रोजन आणि हीलियमपासून बनलेले आहेत', हा आज स्वीकृत असलेला निष्कर्ष त्यांच्याच संशोधनातून समोर आला. सुरुवातीला त्यांच्या निष्कर्षांवर शंका घेतली गेली; परंतु पुढे तो आधुनिक खगोल-भौतिकीचा मूलभूत पाया ठरला. आकाशगंगांच्या संरचनेचा अभ्यास करताना, व्हेरा रुबिन यांनी केलेले संशोधन आधुनिक 'विश्वरचनाशास्त्रा'तील सर्वात महत्त्वाच्या शोधांपैकी एक मानले जाते. आकाशगंगा अपेक्षित वेगाने फिरत नाहीत हे निरीक्षण करत, त्यांनी अदृश्य पदार्थ म्हणजेच 'कृश द्रव्य' अस्तित्वात असल्याचे ठोस पुरावे दिले. आज विश्वातील बहुतांश वस्तुमान अदृश्य स्वरूपात आहे, ही संकल्पना त्यांच्या संशोधनामुळे दृढ झाली. आपल्या संशोधनकार्याबद्दल आयुष्यभर सन्मानित झालेल्या व्हेरा रुबिन यांना 'ब्रूस' पदक, 'रॉयल ॲसस्ट्रॉनॉमिकल सोसायटी'चे 'सुवर्ण' पदक आणि 'नॅशनल मेडल ऑफ सायन्स' प्रदान करण्यात आले असून, चिलीतील व्हेरा सी. रुबिन वेधशाळेला त्यांचे नाव देण्यात आले आहे.'विश्वरचनाशास्त्रा'त त्यांनी कोपर्निकससारखा मूलभूत बदल घडवून आणला, असे मानले जाते. असे असूनही, 'नोबेल' पारितोषिकासाठी त्यांची उपेक्षा झाल्याची टीकाही करण्यात आली आहे. उच्च ऊर्जा खगोलशास्त्रात जोसलिन बेल बर्नेल यांनी, 'पल्सार' या विलक्षण आकाशीय वस्तूंचा शोध लावला. रेडिओ संकेतांमधील नियमित स्पंदनांचा अभ्यास करताना, त्यांनी 'न्यूट्रॉन' ताऱ्यांच्या अस्तित्वाचे निरीक्षण केले. या शोधामुळे तारकांच्या उत्क्रांतीविषयीचे ज्ञान आमूलाग्र बदलले. 'नोबेल' पारितोषिक त्यांच्या मार्गदर्शकांना मिळाले, त्यांना डावलले गेले; तरी वैज्ञानिक समुदायाने पुढे त्यांच्या योगदानाची व्यापक दखल घेतली. 'अवकाश युग' सुरू झाल्यानंतर महिलांनी पृथ्वीबाहेरील संशोधनातही ऐतिहासिक भूमिका बजावली. सोव्हिएत संघातील व्हॅलेन्टिना तेरेश्कोव्हा या अवकाशात जाणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. त्यानंतर सॅली राईडया अमेरिकेच्या पहिल्या महिला अंतराळवीर बनल्या. अवकाशातील सूक्ष्मगुरुत्व प्रयोग, पृथ्वी निरीक्षण आणि उपग्रह प्रणालींच्या चाचण्यांमध्येही त्यांनी सहभाग नोंदवला. पुढे एलीन कॉलिन्स या 'स्पेस शटल'च्या पहिल्या महिला कमांडर ठरल्या, ज्यामुळे अवकाश मोहिमांमधील नेतृत्वस्तरावर महिलांचा प्रवेश दृढ झाला. आधुनिक काळात अवकाश दुर्बिणी आणि ग्रहसंशोधन मोहिमांमध्ये महिलांचे नेतृत्व विशेषत्वाने दिसते. नॅन्सी ग्रेस रोमन यांना 'हबल' अवकाश दुर्बिणीची जननी म्हणून ओळखले जाते. अवकाशाधारित दुर्बिणीची संकल्पना प्रत्यक्षात आणून त्यांनी, पृथ्वीच्या वातावरणाबाहेरून विश्व-निरीक्षणाच्या नव्या युगाची सुरुवात केली. आज दूरस्थ आकाशगंगा, कृष्णविवरे आणि ग्रहजन्म प्रक्रियेचा अभ्यास शक्य होण्यामागे त्यांच्या दूरदृष्टीचा मोठा वाटा आहे. मंगळ ग्रह संशोधनात डायना ट्रुजिलो यांसारख्या संशोधकांनी, 'रोव्हर' मोहिमांच्या संचालनात महत्त्वाची भूमिका निभावली. ग्रहांच्या पृष्ठभागावरील भूगर्भीयबदल समजून घेणे आणि भविष्यातील मानवी मोहिमांसाठी माहिती संकलित करणे, याप्रक्रियेत महिला संशोधक अग्रभागी आहेत. युरोपियन अवकाश संस्थेतील संशोधकांनी धूमकेतू आणि लघुग्रह मोहिमांमध्ये, वैज्ञानिक उपकरण विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आजचे खगोलशास्त्र हे बहुविषयक विज्ञान बनले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणकीय अनुकरण, विशाल डेटा विलेषण आणि बिनतारी संकेत प्रक्रिया यांवर आधारित संशोधनामध्ये महिलांची उपस्थिती झपाट्याने वाढत आहे. गुरुत्वीय तरंग शोधप्रकल्प, एक्सोप्लॅनेट शोधमोहिमा आणि कॉस्मिक मायक्रोवेव्ह पार्श्वभूमी विकिरण अभ्यासामध्ये महिला संशोधक प्रमुख भूमिका बजावत आहेत. विज्ञान-प्रसार क्षेत्रातही महिलांची व्याख्याने, विज्ञान लेखन, डिजिटल माध्यमे आणि शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे खगोलशास्त्र लोकाभिमुख झाले. विज्ञान हे केवळ प्रयोगशाळेतील कार्य नसून, सामाजिक जाणीव निर्माण करणारी प्रक्रिया आहे, हे त्यांनी सिद्ध केले. 'उद्यमेन हि सिद्ध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।' केवळ इच्छा करून नव्हे, तर प्रयत्नांमुळेच कार्य सिद्ध होते.

# राज्यसभा निवडणूक : २६ उमेदवारांची बिनविरोध निवड; बिहारमधील सर्व ५ जागांवर एनडीएचा विजय

नवी दिल्ली : राज्यसभेच्या निवडणुकीत सात राज्यांमधील एकूण २६ उमेदवार यापूर्वीच बिनविरोध निवडून आले आहेत; यामध्ये भाजपानं सात, काँग्रेसनं पाच, तृणमूल काँग्रेसनं चार, डीएमकेनं तीन, तर शिवसेना, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले), राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, एआयएडीएमके, पीएमके आणि यूपीपीएल यांनी प्रत्येकी एक जागा मिळवली आहे.

रिक्त झालेल्या ३७ जागांसाठी निवडणूक : बिनविरोध निवडून आलेल्यांमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे केंद्रीय मंत्री रामदास आठवले, काँग्रेसचे प्रवक्ते अभिषेक मनु सिंघवी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार, तामिळनाडूतील एआयएडीएमकेचे एम. थंबीदुराई, महाराष्ट्रातील भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे आणि पश्चिम बंगालमधील टीएमसीचे राज्यमंत्री बाबुल सुप्रियो यांचा समावेश आहे. दरम्यान, रिक्त झालेल्या ३७ जागांमध्ये महाराष्ट्रातील सात, तामिळनाडूतील सहा, बिहार आणि पश्चिम बंगालमधील प्रत्येकी पाच, ओडिशामधील चार, आसाममधील तीन, तेलंगणा, छत्तीसगड आणि हरियाणातील प्रत्येकी दोन, तसंच हिमाचल प्रदेशातील एका जागेचा समावेश आहे.

बिहारमधील सर्व ५ जागांवर चा विजय : बिहार, ओडिशा आणि हरियाणामध्ये आज दिवसाच्या सुरुवातीलाच राज्यसभा निवडणुकीसाठी मतदान पार पडले. बिहारमध्ये, राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं () सर्वच्या सर्व पाच जागांवर विजय मिळवला. जनता दल (युनायटेड) पक्षाने बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांना उमेदवारी दिली होती आणि त्यांनी विजय मिळवला आहे. ओडिशातून, भाजपा-समर्थित अपक्ष उमेदवार दिलीप राय यांची तिसऱ्या कार्यकाळासाठी राज्यसभेवर निवड झाली. त्यांच्याव्यतिरिक्त भाजपाचे प्रदेशाध्यक्ष मनमोहन सामल, भाजपा नेते सुजित कुमार आणि बीजेडीचे उमेदवार संतृप्त मिश्रा या अन्य तीन उमेदवारांचीही ओडिशातून राज्यसभेवर निवड झाली.

विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ एप्रिलमध्ये संपुष्टात : या राज्यांमधील विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ एप्रिलमध्ये संपुष्टात येत असल्यामुळं, या जागा रिक्त होत आहेत. एप्रिलमध्ये ज्यांचा कार्यकाळ संपणार आहे, त्यामध्ये केंद्रीय मंत्री रामनाथ ठाकूर आणि रामदास आठवले, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शरद पवार, आरएलएमचे उपेंद्र कुशवाह, काँग्रेस नेते अभिषेक मनु सिंघवी, एआयएडीएमकेचे नेते एम. थंबीदुराई आणि डीएमकेचे नेते तिरुची शिवा यांचा समावेश आहे.

बिहारमधील ५ जागांवर एनडीएचा विजय : बिहारमधील पाच जागांसाठी झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत, एनडीएनं पाचही जागांवर महाआघाडीचा पराभव केला. काँग्रेस आणि राजदच्या एकूण चार आमदारांनी मतदानापासून दूर राहिल्यानं महाआघाडीला मोठा धक्का बसला, ज्यामुळं आघाडीचं एकूण गणित बिघडलं. दरम्यान, बिहारमधील या विजयानं बंगालमधील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाला एक शक्तिशाली संदेश दिला आहे.

मनमोहन, सुजीत, दिलीप आणि संतृप्त विजयी : ओडिशातून राज्यसभेच्या निवडणुकीत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष मनमोहन सामल, भाजपा नेते सुजित कुमार, अपक्ष उमेदवार दिलीप रॉय आणि बिजू जनता दलाचे उमेदवार संतृप्त मिश्रा हे विजयी झाले आहेत. भाजपा-समर्थित अपक्ष उमेदवार दिलीप रॉय हे तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवडून आले आहेत. दरम्यान, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन माझी म्हणाले की, ''निवडून आलेले खासदार संसदेत ओडिशाचा आवाज धारदार करतील.'' तर केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दोन्ही भाजपा उमेदवार आणि अपक्ष उमेदवारांचे विजयानंतर अभिनंदन केलं.

# बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पामुळे रहिवाशांच्या जीवनमानात सुधारणा होणार : मुख्यमंत्री फडणवीस

## नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील ८६४ पुनर्वसन सदनिकांचे वितरण







दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील मध्यमवर्गीयाच्या घराचे स्वप्न साकार करण्यासाठी हे शासन कटिबद्ध आहे. मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचा विकास होऊन रहिवाशांच्या जीवनमानात मोठी सुधारणा होणार असल्याचे सांगून बीडीडी चाळीतील रहिवाशांनी आपली घरे विकू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) मार्फत नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील ८६४ पुनर्वसन सदनिकांचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प अनेक वर्षे प्रलंबित होता यामध्ये अनेक अडचणी होत्या. यामुळे राज्य शासनाने निर्णय घेतला की, व्यावसायिक बिल्डरवर भरवशावर अवलंबून न राहता हा प्रकल्प राज्य शासन करेल. देशातील सर्वोत्तम कंपन्यांना हे काम देऊन हा प्रकल्प उत्तमरित्या तयार झाला. मुंबईतील इतर पुनर्विकासाचे काम वेगाने झाले पाहिजे यासाठी शासनाचा प्रयत्न सुरू असून २०२९ पर्यंत सर्व घराच्या चाव्या रहिवांशाना देण्याचो उद्दष्ट्यि आहे.

नायगाव, वरळी या ठिकाणची कामे अतिशय सुंदर झाली आहेत. बीडीडी येथील रहिवांशाना सर्व पायाभूत सुविधा देण्याचा प्रयत्न या ठिकाणी झाला आहे. नायगाव येथील पार्किंगच्या समस्येबाबत मार्ग काढू असे आश्वासनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. या ठिकाणी असलेल्या भवानी माता मंदिराबाबतचा प्रश्न सोडवण्यासाठी ९०० चौरस फ ूट जागा दिली जाणार आहे. बीडीडी चाळीला फार मोठा इतिहास आहे अण्णा भाऊ साठे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा नवरत्नांची खाण या बीडीडी चाळीत राहिलेली आहे. यावर पुस्तक लिहिले पाहिजे असा मानसही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबईतील अनेक ठिकाणी चाळीत राहणाऱ्या नागरिकांना अडचनिंचा सामना करावा लागतो. सामान्य माणसामुळे मुंबई आहे. संस्कृती जपणारा मुंबईकर आहे. मुंबईतील व्यक्तींना मुंबईतच घर मिळाले पाहिजे. जेवढे प्रकल्प हाती घेतले आहे ते पूर्ण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. पोलीसांना हक्काचे घर मिळाले पाहिजे यासाठी प्रयत्नशील असून त्यांच्या घराच्या किमतीच्या प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोलून तो सोडवला जाईल, तसेच यासाठी लागणारे समग्र धोरण तयार करावे लागेल. २०१६ मध्ये पोलिसांना मालकी हक्काचे घर मिळावे यासाठी धोरण आणले आहे, त्यामध्ये सुधारणा कशी करता येईल यासाठी प्रयत्न केला जाईल. तसेच यासाठी कायदेशीर व्यवहारिक मार्ग काढता येईल यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

पुर्नविकासाबाबत मुंबईमधील जवळपास एक हजार एकरचे पुर्नविकास प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. मोठ्या प्रमाणात मुंबई बदलणार आहे सामान्य माणसाला घर मुंबईत मिळणार आहे. सामान्य माणसाचे जीवनात बदल घडवून राज्य शासन प्रयत्नशील आहे. बीडीडी वासीयांना जास्तीत जास्त सुविधा देण्याचा प्रयत्न केला जाणार असून नागरी पुनरुत्थानाच्या दृष्टीने आशिया खंडातील पहिला व सर्वात मोठा पुनर्विकास प्रकल्प म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे. या प्रकल्पाअंतर्गत जुन्या १६० चौ. फूट घरांऐवजी रहिवाशांना सुमारे ५०० चौ. फूट क्षेत्रफळाच्या अत्याधुनिक सोयी-सुविधांनी युक्त टू बीएचके सदनिका विनामूल्य देण्यात येत आहेत.

सर्वसामान्य जनतेला त्यांच्या हक्काचं घर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

आजचा दिवस हा सुवर्ण अक्षराने लिहून ठेवण्याचा दिवस आहे. बीडीडीमध्ये राहणारे आता टॉवर मध्ये राहणार. किती तरी वर्षाची त्यांची स्वप्नपूर्ती पूर्ण होत आहे. या चाळीमध्ये पिढ्यान् पिढ्याचा स्वतःचा लढा, अनुभव, भावनिक, सांस्कृतिक ऋणानुबंध बांधले गेले आहेत. सर्वसामान्य जनतेला त्यांच्या हक्काचं घर, सुख-सुविधा मिळाले पाहिजे असे शासनाचे धोरण आहे. १९ तारखेला गुढी उभारण्याचा आनंद येथील रहिवाशांना मिळणार आहे. पोलीस उन्हातानात आपली कर्तव्य बजावत असतात त्यांना हक्काचे घर देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

बीडीडी मधील रहिवाशांचा १२ वर्षाचा मालमत्ता कर म्हाडा भरणार आहे. बाहेर फेकला गेलेला मुंबईकर मुंबईत परत आणण्याचे काम अशा प्रकल्पाच्या माध्यमातून हे राज्य शासन करत आहे. क्लस्टर, एसआरए सारख्या योजनेच्या माध्यमातून लाखो लोकांना घरे मिळत आहेत. गृहनिर्माण क्षेत्रासाठी शासनाने क्रांतिकारी निर्णय घेतला असून गृहनिर्माण धोरणाच्या माध्यमातून ७० कोटींची गुंतवणूक व तीस लाख लोकांना पर्यावरण पूरक घरे उपलब्ध होणार असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

८६४ लाभार्थ्यांना हक्काच्या घरांच्या चाव्या सुपूर्द हा सुवर्णक्षण उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

जवळजवळ चार दशकांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर आज पहिल्या टप्प्यातील ८६४ लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या घरांच्या चाव्या सुपूर्द करण्याचा हा सुवर्णक्षण आपल्याला अनुभवता येत आहे. ही घरं म्हणजे केवळ इमारत किंवा सिमेंट-विटांचं बांधकाम नाही, तर ते आपल्या स्वप्नांचं, आशा-आकांक्षांचं प्रतिक असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले.

१९२० च्या सुमारास उभारण्यात आलेल्या या ब्रिटिशकालीन बीडीडी चाळी मुंबईच्या सर्वांगीण विकासाच्या, इतिहासाच्या साक्षीदार ठरल्या आहेत. मात्र, या चाळींचा इतिहास हा केवळ इमारतींचा इतिहास नाही; तर तो इथं राहणाऱ्या कष्टकरी आणि सर्वसामान्य कुटुंबांच्या संघर्ष, जिद्द आणि एकात्मतेचा इतिहास आहे. गेली जवळपास चार दशके येथील रहिवासी अधिक सुरक्षित, सुसज्ज आणि सन्मानाने जगता येईल अशा घराच्या प्रतीक्षेत होते. आज या दीर्घ संघर्षाला यश मिळालं असून, बीडीडीवासीयांच्या आयुष्यात एका नव्या पर्वाची सुरुवात होत असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले.

या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सभापती प्रा. राम शिंदे, अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्यमंत्री तथा पालकमंत्री मुंबई उपनगर जिल्हा ॲड आशिष शेलार, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, महापौर रितू तावडे, आमदार चित्रा वाघ, कालिदास कळमकर, मनीषा कायंदे, सिद्धिविनायक न्यायाचे अध्यक्ष सदा सरवणकर, गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्य अधिकारी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळचे मिलिंद बोरीकर यांनी मानले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### पंजाब ते महाराष्ट्र ड्रग्स रॅकेटचा पर्दाफाश; तिघे जेरबंद, कोट्यवधींचा मुद्देमाल जप्त




दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबई पोलिसांनी पंजाब राज्यातून महाराष्ट्रात अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या टोळीवर कारवाई करत तीन जणांना अटक केली आहे. या कारवाईत मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांसह शस्त्रास्त्र आणि इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तपासादरम्यान समोर आले की आरोपी पंजाबमधून ट्रक व रेल्वे मार्गे हेरॉईनसारखे अमली पदार्थ महाराष्ट्रात आणून मुंबई, नवी मुंबई आणि पुणे परिसरात पुरवठा करत होते. त्यानुसार पुणे जिल्ह्यातील चाकण , निगोजे गाव आणि पिंपरी-चिंचवड परिसरात पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली.

या कारवाईत बलजीतसिंग सर्विंदरसिंग उर्फ मोनू, गुरुप्रतापसिंग शरणजीतसिंग उर्फ गोपी (ट्रक चालक) आणि करमजीतसिंग नरिंदरसिंग या तिघांना अटक करण्यात आली. आरोपींकडून सुमारे ४१ लाख ३० हजार रुपयांचे २८.६ ग्रॅम हेरॉईन, ऑस्ट्रियन बनावटीचे एक ग्लॉक पिस्तूल (सुमारे ८ लाख रुपये), दोन मॅगझिन, चार जिवंत काडतुसे, ट्रेलर वाहन आणि चार मोबाईल फोन असा एकूण सुमारे १ कोटी ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल केला गेला असून आरोपींना न्यायालयाने १८ मार्च २०२६ पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

### अरिजीत सिंगनं पार्श्वगायन सोडल्यानंतर श्रेया घोषालनं मांडलं मत, म्हणाली मलाही विश्रांती घ्यावीशी वाटते

हैदराबाद : गायक अरिजीत सिंगनं पार्श्वगायनातून निवृत्ती जाहीर केली, यानंतर अनेक चाहते खूप नाराज झाले होते. या क्षेत्रातील त्याच्या अनेक सहकाऱ्यांनी त्याच्या या धाडसी निर्णयाचे कौतुकही केले. श्रेया घोषालनेही यावर एक पोस्ट शेअर केली होती आणि आता तिनं पुन्हा एकदा या विषयावर आपले मत मांडले आहे. यावेळी तिनं सांगितलं की, तिलाही कधीकधी कामातून विश्रांती (ब्रेक) घ्यावीशी वाटते. एका मुलाखतीमध्ये श्रेया घोषालनं सांगितलं की, ''मलाही कधीकधी कामातून विश्रांती घ्यावीशी वाटते. अरिजीतनं तो निर्णय अत्यंत धाडसानं घेतला... तो मनापासून एक संगीतकार आहे. तो संगीत का निर्माण करत आहे किंवा त्यातून त्याला काय मिळेल, याचा तो विचार करत नाही. त्याला ज्या गोष्टीनं आनंद मिळतो, फक्त तो तीच गोष्ट करतो.'

यानंतर तिनं पुढं म्हटलं, अरिजीत सिंगला त्याच्या कलेप्रती असलेली निष्ठाच त्याला प्रेक्षकांचं प्रचंड स्नेह मिळवून देते.थेट कार्यक्रमांमध्ये लिप-सिंकिंग करून गाण्याचा अभिनय करण्याबद्दल श्रेया घोषालनं म्हटलं,'मला ती गोष्ट अत्यंत अस्वस्थ करणारी वाटते. ज्या दिवशी मला तसे करावे लागेल, त्याच दिवशी मी गाणे थांबवेन.'' दरम्यान सोशल मीडियावरील अरिजीत सिंगचे चाहते विनंती करू लागले होते, की त्यानं घेतला निर्णय हा मागे घ्यावा. याशिवाय त्याच्या काही चाहत्यानं पार्श्वगाण्यातून निवृत्त घेतल्यानंतर एका युगाचा अंत झाल्याचं देखील म्हटलं होतं. याशिवाय, श्रेया घोषालनं अरिजीतच्या पोस्टवर प्रतिक्रिया देताना लिहिलं, ''हा च्या आयुष्यातील एका नव्या पर्वाचा प्रारंभ आहे.

# बुलढाणा जिल्ह्यात जल उत्सवाचा जागर; साखळी खुर्द व गारगुंडी येथे जल अर्पण सोहळा

## ८ ते २२ मार्च दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन; मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांचे सक्रिय सहभागाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** ग्रामीण भागात जल जीवन मिशन अंतर्गत उभारण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजना आता पूर्णत्वाकडे गेल्या असून, या योजनांचे व्यवस्थापन थेट ग्रामस्थांच्या हाती सोपवण्यासाठी जिल्ह्यात जल उत्सव साजरा केला जात आहे. याचाच एक भाग म्हणून बुलढाणा तालुक्यातील साखळी खुर्द येथे १७ मार्च रोजी, तर देऊळगाव राजा तालुक्यातील गारगुंडी येथे १८ मार्च रोजी जल अर्पण दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. ग्रामस्थांनी आपल्या गावच्या पाणीपुरवठा प्रणालीचे संरक्षक म्हणून पुढाकार घ्यावा आणि या सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले आहे.

ग्रामीण भारतात जल जीवन मिशन अंतर्गत उभारलेल्या सुविधा आता संचालन आणि देखभाल दुरुस्तीच्या महत्त्वाच्या टप्प्यात आहेत. या योजना पूर्ण झाल्यानंतर त्यांचे हस्तांतरण काळजीपूर्वक आणि स्पष्टतेने होणे आवश्यक आहे, जेणेकरून पाणी व्यवस्थापनाची जबाबदारी ग्रामपंचायत, ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती आणि समुदायाच्या हाती येईल. यासाठीच ८ ते २२ मार्च दरम्यान देशभरात जल उत्सव साजरा करण्यात येत आहे.

तांत्रिक व संस्थात्मक पूर्वतयारीवर भर: ज्या गावांमध्ये हर घर जल घोषित झाले आहे, अशा ठिकाणी जल अर्पण दिवसासाठी विशेष तांत्रिक पूर्वतयारी करण्यात आली आहे. यामध्ये नळ पाणीपुरवठा योजनेची १५ ते ३० दिवसांची चाचणी, योजनेच्या भागांची पडताळणी, फिल्ड टेस्ट किटद्वारे पाणी गुणवत्तेची तपासणी आणि दस्तऐवजीकरण पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच बँक खात्यासह पाणीपुरवठा स्वच्छता समिती कार्यान्वित करणे, ऑपरेटर व नल जल मित्र यांचे प्रशिक्षण आणि स्त्रोत शाश्वतता आराखडा तयार करण्यावर भर देण्यात आला आहे.

विविध जनजागृती उपक्रम: या उत्सवाच्या निमित्ताने ग्रामसभा घेणे, पीआरएचे () आयोजन करणे, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, शिक्षक व युवक यांचा सुरक्षित पाणी व्यवस्थापनात सहभाग नोंदवणे, असे उपक्रम राबविले जाणार आहेत. साखळी खुर्द व गारगुंडी येथील कार्यक्रमात जल पूजन, नळ पूजन, जल प्रतिज्ञा, शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत.

साखळी खुर्दचे सरपंच पंडित बळीराम हिवाळे, ग्रामपंचायत अधिकारी ज्योती मगर, तसेच गारगुंडीचे सरपंच गजानन काकड व ग्रामपंचायत अधिकारी नितीन अंभोरे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या मोहिमेसाठी जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक सतीश देशमुख आणि कार्यकारी अभियंता अनिल चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले आहे. संबंधित तालुक्यांचे गटविकास अधिकारी व पाणीपुरवठा विभागाचे अभियंते या प्रक्रियेत सक्रिय योगदान देत आहेत.

# महाराष्ट्र हे उद्योग व गुंतवणुकीची उत्कृष्ट परिसंस्था असलेले राज्य- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ब्रिटनमधील खासदारांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची घेतली भेट




**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र हे देशातील सर्वात जास्त परकीय गुंतवणूक असलेले राज्य आहे. हे देशाचे आर्थिक पॉवर हाऊस असून देशाची स्टार्टअप कॅपिटल आहे. महाराष्ट्र हे गुंतवणुकीसाठी उत्कृष्ट परिसंस्था असलेले राज्य असून त्यामुळे राज्यात ब्रिटनमधील गुंतवणूकदारांनी गुंतवणूक करण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मंत्रालयात ब्रिटनमधील बर्मिंगहॅमचे खासदार लियाम बर्न यांच्या नेतृत्वात खासदारांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांची भेट घेतली.

शिष्टमंडळाशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले, राज्याने वन ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट ठेवले आहे. महाराष्ट्र हे देशाचे टेक्नॉलॉजी हब असून देशाच्या एकूण सकल घरेलू उत्पादनात राज्याचा १३ टक्के वाटा आहे. देशात डेटा सेंटरची ६० टक्के कॅपॅसिटी ही महाराष्ट्रात आहे. आपण ब्रिटनचे खरे राजदूत असून आपल्या शिष्टमंडळाची भेट राज्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भारत आणि ब्रिटनमध्ये व्यापक आर्थिक आणि व्यापार करार झालेला आहे. हा करार महाराष्ट्र आणि ब्रिटनसाठी मैलाचा दगड ठरणारा असून कराराच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि ब्रिटनमध्येही व्यापार वृद्धिंगत होईल.

राज्याच्या प्रत्येक भागात उत्पादन क्षेत्रामध्ये मोठी गुंतवणूक येत आहे. राज्यात २०३० पर्यंत एकूण ऊर्जा गरजेपैकी ५२ टक्के ऊर्जा ही नवीनीकरणीय क्षेत्राच्या माध्यमातून निर्माण करण्याच्या ध्येयपूर्तीसाठी शासन काम करीत आहे. केंद्र शासनाने नवीन शिक्षण पद्धतीनुसार देशात विदेशी विद्यापीठांना परवानगी दिली आहे त्यानुसार महाराष्ट्र नवी मुंबई परिसरात एज्युसिटी उभारत आहे. यामध्ये विदेशी विद्यापीठांकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. एज्यूसिटीमध्ये शैक्षणिक दालने उघडण्यासाठी ब्रिटनमधील विद्यापीठांना लेटर ऑफ इंटेंट देण्यात आले आहेत. या वर्षापासून ही विद्यापीठे अभ्यासक्रमही सुरू करीत आहेत. येथे एक लाख विद्यार्थी शिक्षण घेतील, अशी व्यवस्था करण्यात येत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

ब्रिटनमधील लंडन आणि मुंबई ही शहरे आर्थिक विकासाची क्षमता लक्षात घेता साम्य असणारी आहेत. मुंबईत जागतिक फायनान्शियल सेंटर स्थापन करण्यात येणार आहे. तसेच ऑटोमोबाईल उद्योग क्षेत्रात पुणे आणि बर्मिंगहॅम शहरात साम्य असून या उद्योगांना दोन्ही शहरात समान संधी आहेत. गुंतवणुकीसाठी निर्माण केलेल्या परिसंस्थेचा उपयोग करीत ब्रिटनमधील गुंतवणूकदारांना राज्यात गुंतवणुकीच्या मोठ्या संधी आहेत. महाराष्ट्र आणि ब्रिटनमधील भागीदारी निश्चितच उज्वल भविष्यासाठी लाभकारी ठरेल, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी शिष्टमंडळाचे प्रमुख खासदार लियाम बर्न यांनी महाराष्ट्र हे केवळ देशाचे पॉवर हाऊस नाही तर, जगाचे गुंतवणूकदारांचे आकर्षण बनले असल्याचे गौरवोद्गार काढले. बैठकीत मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी अन्बळगण, मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी , गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी शिष्टमंडळाला माहिती दिली.

तसेच ब्रिटनमधील ब्रिटनचे भारतातील उच्चायुक्तामधील उपायुक्त हरजिंदर कांग, शिष्टमंडळातील जस्टिन मेडर्स, एलिसन ग्रिफिट्स, सोनिया कुमार, जॉन कूपर, सराह एडवर्ड्स, जोशुआ रेनॉल्ड्स यांनी आपली मते मांडली. बैठकीचे संचलन मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे यांनी केले.

# कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे सार्वजनिक आरोग्य सेवांना मिळणार नवे बळ – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, तंत्रज्ञानाधिष्ठित आणि लोकाभिमुख करण्याच्या दिशेने राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence -AI) आधारित आधुनिक उपाययोजनांचा प्रभावी वापर करण्यासाठी राज्य शासन आणि वाधवानी एआय (LEHS -I Unit) या सामाजिक हेतूने कार्य करणाऱ्या ना-नफा-ना-तोटा संस्थेमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्या संकल्पनेतून करण्यात आलेल्या या सामंजस्य कराराअंतर्गत क्षयरोग (TB), मातृ, नवजात व बाल आरोग्य (MNCH), प्राथमिक आरोग्य सेवा, ई-हेल्थ आदी क्षेत्रांमध्ये एआय तंत्रज्ञानाचा समावेश करून आरोग्य सेवांचा दर्जा अधिक उंचावण्यात येणार आहे. राज्यातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार, वेळेवर आणि प्रभावी आरोग्य सेवा पोहोचवणे हा या भागीदारीचा मुख्य उद्देश आहे. डिजिटल महाराष्ट्र आता पुढील टप्प्यात प्रवेश करत असून कृत्रिम बुद्धिमत्ता सार्वजनिक आरोग्यासाठी 'फोर्स मल्टिप्लायर' ठरणार आहे. वाधवानी एआयच्या सहकार्याने एआय सक्षम आरोग्य व्यवस्था उभारणार असल्याचे श्री फडणवीस म्हणाले. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, क्षयरोग, प्राथमिक आरोग्य सेवा आणि मातृ-बाल आरोग्यासाठी एआय साधनांचा वापर केल्यास लवकर निदान, सुलभ सेवा आणि अग्रिम कर्मचाऱ्यांना वेळेवर मार्गदर्शन मिळेल. ही भागीदारी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम व सक्षम बनवेल. वाधवानी एआयचे प्रमुख शेखर शिव सुब्रमणियन यांनीही या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त करताना सांगितले की, महाराष्ट्र शासनाबरोबरची ही भागीदारी नवोन्मेष, समता आणि दीर्घकालीन परिणाम साधणाऱ्या आरोग्य सुधारणांसाठी महत्त्वाची ठरेल.

या सामंजस्य करारामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे. क्षयरोग निर्मूलनासाठी एआयचा प्रभावी वापर या उपक्रमांतर्गत क्षयरोग रुग्णांमध्ये उपचार सोडून देण्याचा धोका, उपचारातील अडथळे व मृत्यूची शक्यता उपचाराच्या सुरुवातीलाच ओळखण्यासाठी एआय आधारित प्रणाली वापरण्यात येणार आहे. त्यामुळे उच्च जोखमीच्या रुग्णांवर वेळेत लक्ष देऊन योग्य उपचार करता येणार आहेत.

"Cough Against TB' या एआय आधारित ॲप्लिकेशनच्या माध्यमातून खोकल्याच्या आवाजाचे विश्लेषण करून क्षयरोगाची प्राथमिक ओळख आरोग्य संस्थांमध्ये जलदगतीने करता येणार आहे. याशिवाय, उपगाव पातळीवर (५०० मी. ÷ ५०० मी.) क्षयरोगाचा धोका दर्शविणारे व्हल्नरेबिलिटी मॅपिंग तयार करण्यात येणार असून, लोकसंख्या घनता, आरोग्य सुविधा, प्रदूषण, कुपोषण यांसारख्या घटकांचा अभ्यास करून सक्रिय रुग्ण शोध (ACF) मोहिमा अधिक परिणामकारक रितीने राबविता येणार आहेत.

## शब्दकोडे क्र. 83

आडवे शब्द

१. पुलंचा लेखक म्हणून अखेरचा चित्रपट- 'एक होता -----' ३. वार्ताहर ७. दाद, पोहोच ९. स्पष्ट उच्चार करता न येणारा १०. गतीमान १२. आरोळी १४. यावर्षी १५. गडीमाणसे १८. 'नॅनो' आणणारे टाटा २१. कंटाळवणे (भाषण) २३. करायला गेला मारुती आणि झाले ---! २५. राष्ट्राची सीमा २९. मोका, संधी ३१. विश्वासघातकी ३२. खाटीक ३३. पदर ३४. दबा धरणे ३६. किरकोळ सामान ३९. आश्चर्याची गोष्ट ४२. आमटे, आढाव या समाजसेवकांचे प्रचलित नाव ४४. मोठी गाडी (सं.) ४६. दारावरील खुणेचा आवाज ४८. सजीव-निर्जीव सर्व ५०. नाकावरचा राग ५२. एक जंगली फूल ५३. भिक्षापात्र ५४. रक्त देणे ५७अ. कूळ कायद्याचे मूळ तत्त्व ६१. तात्काळ ६४. विषमच्या विरुद्ध ६६. केसांची बट ६८. पावलोपावली ६९. श्री विष्णूचे एक नाव ७१. किंचित वाकडा ७३. नवरत्नांपैकी एक प्राणिज रत्न ७४. कारस्थानी ७५. दाट, घट्ट ७६. अभिप्राय

उभे शब्द

१. प्रशाला २. क्रिकेटमधील सहाचा फटका ३. च्या बद्दल ४. अखेर, शेवट ५. वैरी ६. अंगातीक मस्ती, जोम ७. जन्मदाता ८. मनात संशय निर्माण होणे याअर्थी वाक्प्रचार ११. बडबड्या १३. पद्धतीनुसार १६. लक्ष्मी १७. बाजू, काठ १९. पुरुष २०. खोट्या नाण्याचा आवाज २२. टाळाटाळ, चुकवाचुकव २४. वार २६. हद्दीच्या पलीकडे २७. मिठाची चव २८. शिर्डीचे संत २९. अमावस्या ३०. वारा (सं.) ३१. होम ३५. सैन्याचे पथक ३७. घाबरणे ३८. तफावत, अंतर ४०. जंगलात विहार करणारे प्राणी ४१. परमेश्वर ४२. भारतभूषणचा गाजलेला सिनेमा, बैजू --- ४३. केर ४५. प्रेतावरील कापड ४६. रोखलेली नजर ४७. शेंगेवरील आवरण ४९. युद्ध, मारामारीत रक्त सांडणे ५१. घटस्फोट ५३. दगडाचा पातळ पापुद्रा ५५. नाठाळ, आडमुठ्या ५६. खळबळजनक ५७. चुलती ५८. सेनानायक ५९. हिंदीत राजीनामा ६०. वजनदार ६२. पाण्याचा गोंगाट? ६३. स्पष्टवक्ता, तोंडाळ ६५. शूर पुरुष ६७. हिंदुस्थान ६९. सततचे नामस्मरण ७०. पर्वत ७२. समान, तुल्यबळ


### शब्दकोडे क्र. 82 चे उत्तर

आडवे उत्तर

१.कुलवधू ४.कानवला ७.रगमतगमत १२.माग १३.पहेलवान १५.मगर १६.नोट १७.रब १८.लव १९.राजराणी २१.मोह २२.वग २४.जयजयकार २८.खास २९.रज ३१.कसाबसा ३३.सावज ३६.मारामारी ३८.हर हर ४०.तन मन ४३.पाडवा ४५.सवत ४६.पापा ४७.मकर ४८.कल्प ४९.कळस ५०.सतत ५१.साव ५२.मत ५४.लगत ५६.टपाल ५८.टोळ ५९.सहज ६२.पोक ६३.बरसात ६५.कोरी ६६.अवयव ६७.दामचुंबक ६९.याचक ७०.ठार मारणे ७३.तगर ७५.रूस ७७.मानव ७९.जर ८०.रसद ८४.नरकवास ८५.साम ८६.मनमुराद

उभे उत्तर

१.कुमारवय २.लगबग ३.धूप ४.कालवण ५.नव ६.वनराज ७.रमणीय ८.मग ९.तर १०.मनोहर ११.तट १४.हेल २०.राजस २१.मोका २३.कसाब २५.जर २६. यजमान २६अ.खासा २७.वसाहत २८.खाज ३०.परिवार ३१.कवडसा ३२.साहस ३४.वर ३५.मौन ३७.मादक ३९.रवरव ४०.तपास ४१.मद्रास ४३.पारखणे ४४.वायफट ४६.पाळत ४७.मतलब ४९.कमळ ५१.साल ५३.नाहरकत ५७.पाणवठा ५८.टोकदार ५९.सबब ६०.जसा ६१.ठेव ६४.तयार ६५.कोकरू ६६.असामान्य ६८.मणेर ७१.रजक ७२.मरवा ७४.गरम ७६.सरोद ७८.वन ८१.ससा ८२.दम ८३.चमू



वृत्तविशेष...


## अकोल्यात ठाकरे गटाचे प्रधानमंत्री ग्रामसडक कार्यलयात ठिय्या आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोल्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना कार्यालयात ठाकरेंच्या शिवसेनेने ठिय्या आंदोलन केले. तब्बल दीड तास हे ठिय्या आंदोलन सुरू होतं.तर जिल्ह्यात सहा महिन्यापूर्वी बांधण्यात आलेल्या ३ सिमेंट रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचा असल्याचा आरोप करीत ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी हे आंदोलन केलं आहे.तर अकोल्यातील बाभुळगाव ते गुडधी, गुडधी ते घुसर आणि घुसर-उगवा या ११ किमी रस्त्याचं बांधकाम सहा महिन्यापूर्वीच पूर्ण झालं होत.तर बांधण्यात आलेल्या या सिमेंट रस्त्यांसाठी ४६ कोटी रुपये इतका खर्च लागला. मात्र हा रस्ता निकृष्ट दर्जाचा असून या रस्त्यावर मोठ्या भेगा पडल्या, त्यामुळे संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी, अशा मागणीसाठी आज ठाकरे गटाने प्रधानमंत्री ग्राम सडक योजना कार्यालयात ठिय्या आंदोलन केले आहे . ठाकरेंच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले आहे.

## गॅस तुटवड्याच्या अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाईचा इशारा; जिल्ह्यात २५ हजारांहून अधिक सिलेंडर उपलब्ध





**बुलढाणा/प्रतिनिधी :** संपूर्ण देशभरात गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने बुलढाणा जिल्ह्यात देखील नागरिकांनी गॅस सिलेंडर एजन्सी समोर रांगा लावत गर्दी केली.. मात्र बुलढाणा जिल्ह्यात घरगुती गॅसचा कुठलाही तुटवडा नसून दिवसाला सरासरी १० हजार गॅस सिलेंडरची मागणी आहे, सध्या २५ हजार पेक्षा अधिक सिलेंडर उपलब्ध असून नियमित पुरवठा सुरू आहे, तर गॅस सिलेंडर संदर्भात समाज माध्यमांवर अफवा पसरवणाऱ्यावर कडक कारवाईचा इशारा जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे..

## मेरी पॉलिसी, मेरे हाथ' उपक्रमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन; मेहकर तालुक्यात विमा पॉलिसी वाटप




दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव:** प्रधान मंत्री फसल विमा योजनेअंतर्गत 'मेरी पॉलिसी, मेरे हाथ' या उपक्रमाच्या माध्यमातून मेहकर तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याबाबत मार्गदर्शन करण्यात येत असून गावागावात विमा पॉलिसीचे वाटपही करण्यात येत आहे. हा उपक्रम २५ फेब्रुवारी २०२६ पासून तहसील कार्यालयाच्या वतीने राबविण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत शेतकऱ्यांना पीक विम्याचे महत्त्व, विमा संरक्षणाचे फायदे तसेच नुकसान झाल्यास मिळणाऱ्या भरपाईबाबत सविस्तर माहिती देण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांच्या हाती थेट विमा पॉलिसी देऊन त्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात आहे.

दरम्यान, सावत्रा येथील शेतकरी वैभव निकस यांना निवासी तहसीलदार बोरकर यांच्या हस्ते पीक विमा पॉलिसीचे वितरण करण्यात आले. यावेळी चे तालुका समन्वयक आशिष पुरी व वसीम शाह उपस्थित होते.

या उपक्रमामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये पीक विमा योजनेबाबत जनजागृती होत असून अधिकाधिक शेतकरी विमा संरक्षणाखाली येण्यास मदत होत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# इंधन टंचाईच्या काळातही शेगाव संस्थान स्वयंपूर्ण; गॅसविना ५० हजार भाविकांना दररोज महाप्रसाद

दैनिक आपला विदर्भ





**शेगाव/प्रतिनिधी :** जगभरात इंधन टंचाईची परिस्थिती निर्माण झाली असताना शेगाव येथील श्री संत गजानन महाराज संस्थान पुन्हा एकदा आपल्या दूरदृष्टीपूर्ण व्यवस्थापनामुळे चर्चेत आले आहे.

संस्थानमध्ये दररोज सुमारे ५० हजार भाविकांसाठी महाप्रसाद तयार केला जातो आणि तोही गॅसविना, ही बाब विशेष ठरत आहे.

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे अनेक ठिकाणी घरगुती तसेच व्यावसायिक गॅसचा तुटवडा जाणवत आहे. मात्र या परिस्थितीचाही कोणताही परिणाम शेगाव संस्थानच्या अन्नछत्रावर झालेला नाही. संस्थानने सुमारे १३ ते १४ वर्षांपूर्वी दूरदृष्टी ठेवत सौरऊर्जेवर चालणारी मेगा किचन व्यवस्था उभारली होती. गजानन महाराज मंदिरापासून सुमारे पाच किलोमीटर अंतरावर आठ एकर परिसरात आधुनिक मेगा किचन उभारण्यात आले आहे. या परिसरातील इमारतींवर सोलर पॅनल बसवून सौरऊर्जा निर्मिती केली जाते. या ऊर्जेचे रूपांतर विद्युत ऊर्जेत करून बॉयलरमधील पाणी गरम केले जाते आणि त्या वाफेवर अन्न शिजवले जाते. या प्रणालीमुळे सुमारे ७० टक्के अन्न शिजवण्याची प्रक्रिया सौरऊर्जेवर चालते. ढगाळ वातावरणामुळे सौरऊर्जा निर्मितीत अडथळा निर्माण झाल्यास पर्यायी स्वरूपात लाकडांचा वापर केला जातो. त्यामुळे अन्नछत्राची सेवा कोणत्याही परिस्थितीत अखंड सुरू राहते.

आज जगभरात ऊर्जा आणि गॅसची टंचाई भासत असताना शेगाव संस्थान मात्र एकही गॅस सिलिंडर न वापरता दररोज हजारो भाविकांना महाप्रसाद देत आहे. संस्थानच्या या दूरदृष्टीपूर्ण व्यवस्थापनाचे भाविकांकडून तसेच विविध क्षेत्रातून कौतुक होत असून इतर धार्मिक संस्थांसाठीही हा आदर्श ठरत आहे.

## धर्मवीर स्व. दिलीपराव रहाटे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या मेहकर स्थानिक कार्यालयात धर्मवीर स्वर्गीय दिलीपराव रहाटे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या कार्यक्रमात मेहकर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी स्व. दिलीपराव रहाटे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांचे सामाजिक व राजकीय योगदान उपस्थितांसमोर मांडले.

यावेळी नगरसेवक महेश रिंढे, नगरसेवक नितीन तुपे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी स्व. दिलीपराव रहाटे यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## वारकरी संप्रदायाला काळिमा फासणारी घटना, कीर्तनकाराचा ५ वर्षांपासून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

अहिल्यानगर : जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथून वारकरी परंपरेला काळिमा फासणारी घटना सम ोर आली आहे. एका वारकरी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षानं तसेच, कीर्तनकारानं १७ वर्षीय मुलीवर तब्बल ५ वर्षे अत्याचार केल्याची घटना उघडकीस आला आहे. या प्रकरणी ढवळपुरी येथील श्री दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्थेचा अध्यक्ष यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ (महाराज) याला पारनेर पोलिसांनी अटक केली आहे. पीडित मुलगी आठवीत असल्यापासून, म्हणजेच २०२१ पासून हा अत्याचाराचा प्रकार सुरू होता. एवढंच नव्हे तर नराधम आरोपीनं मुलीला गरम लोखंडी पक्कडीनं चटके देत अमानुष मारहाण केल्याचंही फिर्यादीत नमूद करण्यात आलं आहे.

खरं तर, आरोपी यशवंत थोरात हा पीडितेच्या शेजारीच राहत असल्यानं दोन्ही कुटुंबांमध्ये घरोब्याचे संबंध होते. पीडितेचा भाऊ आरोपीच्या वारकरी शिक्षण संस्थेत सचिव म्हणून कार्यरत असल्याचा फायदा घेत आरोपीनं २०२१ पासून मुलीवर वाईट नजर ठेवली. मुलगी घरी एकटी असताना किंवा आरोपीच्या घरी कोणी नसताना त्यानं तिच्यावर वारंवार बळजबरीनं अत्याचार केल्याचं समोर आलं आहे. पीडितेनं विरोध करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीनं तिला जीवे मारण्याची धमकी दिली.

'मी दोन हाफ मर्डर केले आहेत, जर कोणाला काही सांगितलं तर तुझ्या आई-वडिलांना आणि भावाला मारून टाकीन,' अशी भीती दाखवत संशयीत आरोपीनं तिला गप्प बसण्यास भाग पाडलं. कुटुंबाच्या जीवाच्या भीतीनं पीडितेला हा छळ अनेक वर्षे मुकाट्यानं सहन करावा लागला. दरम्यान १० मार्च २०२६ रोजी या अत्याचाराचा कळस गाठला. आरोपीनं पीडितेला फोन करून आपल्या घरी बोलावलं.

## बुलढाण्यात घरगुती गॅसचा गैरवापर उघड; तहसीलदारांच्या कारवाईत १४ सिलिंडर जप्त



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शहरात घरगुती गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवत असल्याच्या तक्रारींनंतर जिल्हा प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. या पार्श्वभूमीवर बुलढाण्याचे तहसीलदार विठ्ठल कुमरे यांच्या पथकाने शहरातील विविध हॉटेल्स व व्यावसायिक प्रतिष्ठानांवर धडक तपासणी मोहीम राबवली.

तक्रारींची दखल घेत तहसीलदार कुमरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने शहरातील सुमारे ४० हॉटेल्स व प्रतिष्ठानांची तपासणी केली. या तपासणीदरम्यान अनेक ठिकाणी घरगुती गॅस सिलिंडरचा व्यावसायिक कारणांसाठी वापर होत असल्याचे आढळून आले. दरम्यान कारवाई करत १४ घरगुती गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले. काही हॉटेल चालकांनी कारवाईची माहिती मिळताच सिलिंडर लपवून ठेवण्याचाही प्रयत्न केल्याचे समोर आले.

घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर करून कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती तहसीलदार विठ्ठल कुमरे यांनी दिली.

प्रशासनाच्या या कारवाईमुळे शहरातील गॅसचा गैरवापर रोखण्यास मदत होणार असून पुढील काळातही अशा प्रकारच्या तपासण्या सुरू ठेवण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## बुलढाण्यात २० मार्च रोजी जिल्हास्तर कन्या क्रीडा महोत्सवाचे आयोजन

### बेटी बचाओ-बेटी पढाओ मोहिमेअंतर्गत मुलींसाठी विविध क्रीडा स्पर्धा; जिल्हा क्रीडा संकुल येथे रंगणार सामने

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र पुरस्कृत बेटी बचाओ-बेटी पढाओ मोहिमेअंतर्गत मुलींच्या क्रीडा कौशल्याला वाव देण्यासाठी बुलढाणा येथे जिल्हास्तरीय कन्या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये जिल्हा महिला व बालविकास कार्यालय आणि जिल्हा क्रीडा कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २० मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा क्रीडा संकुल येथे या स्पर्धा पार पडतील.

या क्रीडा महोत्सवात मैदानी आणि वैयक्तिक अशा दोन्ही प्रकारच्या खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. मैदानी स्पर्धांमध्ये १०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे आणि लांब उडी तसेच वैयक्तिक खेळामध्ये बॅडमिंटन आणि बुद्धीबळ तर सांघिक खेळांमध्ये कबड्डी क्रीडा स्पर्धा होणार आहे.सदर स्पर्धा १४ आणि १७ वर्षांखालील मुलींसाठी आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या मुलींचे वय १२ ते १८ वर्षे वयोगटातील असावे. तसेच खेळाडूंची जन्मतारीख ही शालेय जन्म दाखल्याच्या निकषाप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आणि विजयी ठरणाऱ्या खेळाडूंना ट्रॉफी (करंडक) व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील किशोरवयीन मुलींना आपली क्रीडा प्रतिभा सिद्ध करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. क्रीडा महोत्सवात जिल्ह्यातील जास्तीत जास्त किशोरवयीन मुलींनी सहभागी व्हावे आणि शाळांनी आपल्या विद्यार्थिनींना या स्पर्धांसाठी प्रोत्साहित करून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि. एस.महानकर यांनी केले आहे.

## बारामती पोटनिवडणूक लढवावी, असा कार्यकर्त्यांचा आग्रह - हाके

**बारामती/प्रतिनिधी :** : ओबीसी नेते लक्ष्मण हाके आज बारामती दौऱ्यावर आहेत. बारामतीतील अनेक गावांना त्यांनी भेट दिली. बारामतीतील शेकडो कार्यकर्त्यांचे मला फोन आले असून, ''तुम्ही निवडणूक लढवावी,'' अशी कार्यकर्त्यांची भावना असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी लक्ष्मण हाके यांनी बारामती विधानसभा पोटनिवडणूक लढविण्याचे संकेत दिले आहेत.

## बिबट्यांच्या वावरामुळे शेतकरी दहशतीखाली; वन विभागाच्या हलगर्जीपणामुळे संताप

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील घाटपुरी शिवारात गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांचा मुक्त वावर सुरू असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शेतात बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दोन बिबट्यांचे दर्शन झाल्याने या दहशतीत आणखी भर पडली आहे.

मात्र, या गंभीर प्रकाराकडे वन विभागाने सपशेल दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

घाटपुरी येथील शेतकरी नामदेव चोपडे यांच्या शेतात २७ फेब्रुवारी रोजी सर्वप्रथम बिबट्या दिसून आला होता. त्यानंतर त्यांनी वन विभागाला याची रीतसर माहिती दिली. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आणि वन विभागाने त्यावेळी घटनास्थळाची पाहणी केली, मात्र बिबट्याला पकडण्यात त्यांना यश आले नाही. तब्बल अठरा दिवसानंतर परिसरात पुन्हा बिबट्या दिसल्याची माहिती मिळताच शेतकरी चोपडे यांनी सुरक्षेच्या दृष्टीने आपल्या शेतात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले.या कॅमेऱ्यांमध्ये दोन बिबट्यांचा वावर स्पष्टपणे कैद झाला आहे.

या बिबट्यांनी शेतात प्रवेश केल्याचे दिसत असले तरी, ते बाहेर पडल्याची कोणतीही नोंद कॅमेऱ्यात नाही, ज्यामुळे बिबट्या अजूनही मका पिकात लपून बसल्याची दाट शक्यता आहे.शेतकऱ्यांनी स्वतःच्या संरक्षणासाठी फटाके फोडून शेतात जावे लागते.त्यामुळे वारंवार तक्रार करूनही वन विभागाचे कर्मचारी केवळ पाहणी करून परत जात असल्याचा आरोप होत आहे.

बिबट्याला जेरबंद करण्यासाठी अद्याप ठोस पावले उचलली गेलेली नाहीत. बिबट्याच्या दहशतीमुळे शेतात काम करायला मजूर मिळणे कठीण झाले आहे. स्वतः शेतात काम करतानाही जीव मुठीत धरून राहावे लागते. वन विभागाने तातडीने या बिबट्यांचा बंदोबस्त करावा,अशी मागणी नामदेव चोपडे यांनी केली आहे. वेळेवर उपाययोजना न केल्यास भविष्यात मानवी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आता वन विभाग या बिबट्यांना जेरबंद ठोस पावले



उचलावी अशी मागणी केली जात आहे.